महाराष्ट्रातील महिला महाविद्यालयातील प्राध्यापिकांच्या लेखन व वाचन सवयी : एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आंतर विद्याशाखे अंतर्गत ग्रंथालये आणि माहितीशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधक

प्रिती केशवराव सावंत

(M. Lib & I.Sci.)

मार्गदर्शक

डॉ. घ. ना. पांचाळ

ग्रंथपाल

संशोधन केंद्र

माध्यमशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

सारांश :

प्रस्तावना :

विषय निवडीची भूमिका :-

उद्दिष्टे :-

संशोधनाची गृहितके :-

संशोधनाच्या मर्यादा व व्याप्ती :-

संशोधन पध्दती :-

माहिती संकलनाची साधने :-

माहिती सकंलनाची तंत्रे

संदर्भ :-

सारांश :

आपण ह्या मांडलेल्या शोध प्रबंधात महाराष्ट्रातील प्राध्यापिका महिला यांच्या लेखन आणि वाचन कार्याचे संशोधन करण्यातयेणारआहे. ह्या मध्ये थोडक्यात प्रस्तावना विषय निवडीची भूमिका उद्दिष्ट्ये, प्राथमिक अनुमान इत्यादी बाबींचा थोडक्यात विश्लेषण करण्यात येणार आहे. सदरील संशोधनासाठी केसस्टडी संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सदरील संशोधनाचे समाजाच्या दृष्टीने कार्य महत्वाचे आहे हे देखील मांडण्यात येणार आहे. त्या बरोबरच थोडक्यात संशोधन प्रकरणांचा आढावा वार्षिक नियोजन व अपेक्षित परिणामांचा देखील आढावा घेण्यात आला आहे.

प्रकरण पहिले :-

महाराष्ट्रातील महिला महाविद्यालयातील प्राध्यापिका यांच्या लेख व वाचन सवयीचा, त्यांच्या लेखन, वाचन कार्याचा व त्यांनी विविध साहित्य संमेलनात मिळालेल्या पारितोषकाचा अभ्यास करण्यात येणार आहे. ह्याद्वारे आपल्याला असे स्पष्ट करण्यास मदत होईल की महिलांना लेखनात कोणत्या प्रकारच्या अडचणी येतात त्या अडचणीवर त्या महिला प्राध्यापिका कशा प्रकारे मात करून त्यांचे वाचन, लेखन यात सातत्य ठेवू शकतात.

प्रकरण दुसरे :- संशोधन पध्दती

आपण ह्या संशोधन पद्धती प्रकरणात संशोधन विषयाशी संबंधीत असणाऱ्या बाबींची मांडणी करण्यात येणार आहे. संशोधनाचे महत्व, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहितके, नमुना निवड पद्धत, संशोधनाची तंत्रे, मुलाखत पद्धती, संशोधनाची मर्यादा ह्या बाबींचा समावेश या प्रकरणात केला जाणार आहे.

प्रकरण तिसरे :- महाराष्ट्रातील महिला प्राध्यापिकांची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थिती व त्यांच्या लेखन व वाचनाच्या सवयी यावर संशोधन केले जाणार आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये मुलाखत व प्रश्नावलीच्या माहितीच्या आधारे त्यांच्या लेखन व वाचनाच्या सवयी याचे संशोधन करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे :- महाराष्ट्रातील महिला प्राध्यापिकांच्या लेखन व वाचनात महिलांचे योगदान व त्यांच्या भूमिका मांडण्यात येणार आहेत.

प्रस्तुत संशोधन प्रकरणात विविध प्रकारचे संदर्भ ग्रंथ, मुलाखत अनुसूची, तथ्य यांचे संकलन ह्या आधारे महाराष्ट्रातील लेखन व वाचन ह्यांच्या सवयी व त्यांचे समाजावर होणारे परिणाम जाणून घेतले जाणार आहे.

प्रकरण पाचवे :- निष्कर्ष

आपल्याला ह्या संशोधनात गृहीत कृत्याची चाचपणी करून त्यांची असत्यता व सत्यता तपासण्यात येणार असून संशोधनाच्या निष्कर्षाची मांडणी करण्यात येणार आहे.

वरील संशोधन आराखडा हा कच्च्या स्वरूपात असून प्रत्यक्ष आपण संशोधन करताना अनेक वेळेस ह्यात बदल होण्याची दाट शक्यता आहे.

प्रस्तावना :

एकविसाव्या शतकात आज समाजात खूप मोठ्या प्रमाणावर बदल घडत आहेत. आजच्या आधुनिक युगात स्त्रिया देखील पुरूषांच्या बरोबरीने शिक्षण पूर्ण करून विविध प्रकारच्या नौकऱ्या करीत आहेत त्यातील एक प्रकार म्हणजे अध्यापन ही नौकरी देखील अनेक महिला वर्ग यशस्वी पध्दतीने पार पाडत आहेत. आज सगळीकडे देखील महिला व त्यांचे योगदान मोठ्या प्रमाणात दिसून येते.

महिला प्राध्यापिका ह्या आपला व्यवसाय सांभाळतातच पण त्या बरोबर लेखन व वाचन देखील करतात. अशाच प्रकारच्या काही लेखिका त्यांचे वाचन व लेखनाचा आपण ह्या संशोधनात आढावा घेणार आहोत. मानव हा प्रगतशील प्राणी आहे असे मानले जाते. आपल्याला त्यांच्या ज्ञानांच्या कक्षा रूंदावण्यासाठी मानवाने आज बऱ्याच क्षेत्रात संशोधन केलेले दिसून येते. ह्या अशा संशोधनामुळे ज्ञान वाढते. त्याचप्रमाणे महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या सेवा व सुविधा तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. वापर योग्य पध्दतीने केल्याने संशोधनामुळे पारंपारिक महाविद्यालयातील महिला प्राध्यापिका ह्याचे आजवर झालेले लेखन व वाचन यांचा आपण सविस्तरपणे अभ्यास पाहणार आहोत त्यासाठी महाराष्ट्रातील महिला प्राध्यापिका यांच्या वाचन व लेखन योग्य प्रमाणात आपण संशोधन करणार आहोत.

विषय निवडीची भूमिका :-

ग्रंथालय व माहितीशास्त्र पीएच.डी. पदवीसाठी आपल्याला शोध प्रबंध सादर करावयाचा आहे आणि त्यासाठी आपण महाराष्ट्रातील महिला प्राध्यापिकांचे लेखन व वाचन याचा संशोधन करणार आहोत.

आपण एखाद्या विषयाचा संशोधन करतो तेंव्हा त्यांच्या विविध प्रकारच्या अडचणी असतात. त्या अडचण दूर करण्याकरीता यांचा महिला प्राध्यापिकालालेखन आणि वाचनात येणाऱ्या अडचणी दूर करता येतील व या प्रकारे महिला प्राध्यापिकांचे लिखान कार्यात किती व कशा प्रकारचे योगदान आहे. हे मांडण्याचा थोडक्यात प्रयत्न केला आहे.

उद्दिष्टे :-

1) महाराष्ट्रातील महिला प्राध्यापिका यांच्या लेखन कार्याची माहिती घेणे.

2) महाराष्ट्रातील महिला प्राध्यापिका यांच्या लेखन कार्याचे विषयनिहाय व भाषानिहाय वर्गीकरण करणे आणि त्यांची यादी बनविणे.

3) महाराष्ट्रातील महिला प्राध्यापिका यांच्या लेखन कार्य संदर्भात त्यांचे सहकारी इतर महाविद्यालय आणि त्यांनी स्वत: वाचलेल्या ग्रंथाचा परामर्श घेणे.

4) महाराष्ट्रातील महिला प्राध्यापिका यांनी विविध साहित्य संमेलन, अधिवेशन, कार्यशाळा चर्चासत्रे यातील योगदानाचा आढावा घेणे.

5) महाराष्ट्रातीलप्राध्यापिका महिला यांना मिळालेल्या विविध पुरस्कारांची माहिती जाणून घेणे.

6) महाराष्ट्रातील महिला प्राध्यापिका यांच्या लेखन कार्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

7) महाराष्ट्रातील महिला प्राध्यापिकांच्या लेखन कार्यातील विविध लेखकांचे योगदान जाणून घेणे.

संशोधनाची गृहितके :-

1) महाराष्ट्रातील अनेक महिला प्राध्यापिकालेखन कार्यात पारंगत आहेत.

2) महाराष्ट्रातील महिला प्राध्यापिका या विविध विषयात व भाषेत लेखन करतात.

3) महाराष्ट्रातील महिला प्राध्यापिका यांचे विविध साहित्य संमेलन, अधिवेशने, कार्यशाळा चर्चासत्रे यातील योगदान समाधानकारक आहे.

4) महाराष्ट्रातील महिला प्राध्यापिका यांच्या लेखन कार्यात संदर्भात त्यांचे सहकारी, इतर प्राध्यापक आणि त्यांनी लिहिलेल्या साहित्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे.

5) महाराष्ट्रातील महिला प्राध्यापिका यांना विविध पुरस्कार मिळाले आहेत.

6) महाराष्ट्रातील महिला प्राध्यापिका यांच्या लेखन कार्यात त्यांचे सहयोगी, सहकर्मचारी यांचे योगदान परिणामकारक आहे.

संशोधनाच्या मर्यादा व व्याप्ती :-

संशोधन पध्दती :-

एखाद्या व्यक्तिला वस्तुच्या घटनेच्या बाबतीत सर्वच माहिती असलेच असे नाही. त्यामुळे व्यक्तीचे शोध घेण्याचे प्रयत्न अखंड चालू ठेवले पाहिजे. ज्ञानाची वृध्दी करणे, अस्पष्ट ज्ञानाचे स्पष्टीकरण करणे आणि त्याची विद्यमान ज्ञानाची सत्यता पडताळणे हे संशोधनाचे उद्देश आहेत. मानव हा एक अतिशय हुशार व बुध्दीजीवी आणि जिज्ञासू वृत्तीचा प्राणी असल्यामुळे तो नवीन ज्ञानाचा शोध घेणे, विशिष्ट घटनांचा शोध घेणे, विशिष्ट घटनांमधील नवीन सबंध शोधण्याच्या दृष्टीने कोणत्यातरी संशोधन पध्दतीचा उपयोग करणे हा संशोधनाचा अर्थ आहे.

संशोधन ही एक तर्कशुध्द प्रक्रिया आहे. घटनांमधील संबधांचा शोध घेणे म्हणजेच संशोधन होय:- प्रा. लक्ष्मण थोरात

सदरील संशोधनात केस स्टडी संशोधन पध्दतीचा अवलंब केला जाणार असून मुलाखत व प्रश्नावलीचा अवलंब केला जाणार आहे.

केस स्टडी :-

समस्या आणि संशोधन विधान विकसीत केल्यानंतर केस स्टडी लिहण्याची पहिली पायरी म्हणजे तपासल्या जाणाऱ्या घटनेची निवड करून घेणे.

केस स्टडी म्हणजे एखाद्या विशिष्ठ विषयाचा तपशिलवार अभ्यास. जसे की एखादी व्यक्तीगट, ठिकाण, घटनासंस्था, केस स्टडी सामान्यत: सामाजिक, शैक्षणिक, क्लिनिकल व व्यवसाय संशोधनात वापरले जाते.

केस स्टडी रिसर्च डिझाईन मध्ये सहसा गुणात्मक पध्दतींचा समावेश असतो. परंतू काही वेळा परिणात्मक पध्दती देखील वापरल्या जातात. केस स्टडीज हे संशोधनात समस्येचे विविध पैलू वर्णन करण्यासाठी, तुलना करण्यासाठी, मूल्यांकन करण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी चांगले असतात. जेव्हा आपल्याला एखाद्या वास्तविक विश्व विषयाबदल ठोस संदर्भित सखोल ज्ञान मिळवण्याचे असेल तेव्हा केस स्टडी ही एक योग्य संशोधन रचना असते.

मुलाखत :-

मुलाखत हा एक मौखिक प्रकार आहे. संबंधित व्यक्तिशी प्रत्यक्ष संभाषण अथवा गप्पा गोष्टी करून संशोधन विषयासबंधी तथ्य संकलित करणाऱ्या क्रियेस मुलाखत असे म्हणतात. या पध्दतीच्या विचारांचे ठराविक प्रश्न निवडून उपभोक्त्यांना त्याप्रमाणे विचारण्यात येतात. किंवा वेळेवर उपभोक्त्यांच्या स्वभावानुसार प्रश्न विचारले जातात. उपभोक्त्यांना अशा प्रकारे मुलाखत घेऊन प्रश्नाद्वारे माहिति मिळवणे ही एक महत्वपूर्ण पध्दती आहे. त्या पध्दतीचा महत्वाचा फायदा असा की, उपभोक्त्याच्या प्रकारानुसार प्रश्न विचारले जातात व कमी जास्त

सोयीनुसार प्रश्न विचारले जाऊन, त्यामुळे उत्तरही बोलके आणि वास्तववादी अशा प्रकारचे असते.

प्रश्नावली :-

प्रश्नावली हे तथ्य संकलनाचे महत्वाचे साधन आहे. Field study मध्ये प्रश्नावली महत्वाचे कार्य करते. संशोधनाचे क्षेत्र मोठे असल्यास प्रश्नावलीचा उपयोग होतो. त्यावेळी निरीक्षण, मुलाखत या तत्रांची उणिव प्रश्नावली भरून काढते. प्रश्नावली पोस्टाने पाठविले जाते व तथ्य सकंलनास त्यांची मदत होते. संशोधन क्षेत्र विशाल असेल तरी प्रश्नावलीच्या सहाय्याने आवश्यक तथ्य घरी बसून प्राप्त करता येतात. प्रश्नावलीच्या माध्यमातून अप्रत्यक्ष संपर्क साधता येतो.

माहिती संकलनाची साधने :-

सदरील संशोधनात प्रामुख्याने केस स्टडी साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

माहिती सकंलनाची तंत्रे :-

पाहणी, प्रत्यक्ष निरीक्षण व सामुदायिक रेकॉर्ड इत्यादींचा वापर करण्यात येणार आहे.

समारोप :-

महाराष्ट्रातील महिला महाविद्यालयातील प्राध्यापीका यांचे लेखन केवळ साहित्यातील एक प्रवृत्ती नसून, ती आपल्या समा जाच्या बदलत्या प्रवाहांची साक्ष आहे. महिला प्राध्यापिकांनी आपले अनुभव,

भावना आणि संघर्ष मांडण्यासाठी लेखनाला एक सशक्त माध्यम म्हणून वापरले पाहिजे. त्यांच्या लेखनातून सामाजिक विषमता, स्त्री-अस्मिता स्वातंत्र्य आणि हक्क त्यांच्या शैक्षणिक कार्याच्या अडचणी अशा महत्वाच्या विषयांना वाचा फोडली जाते. आज महिला लेखन हे त्यांच्या महाविद्यालयापूरते मर्यादीत न राहता राजकारण, अर्थशास्त्र तंत्रज्ञान आणि विज्ञान अशा प्रकारच्या क्षेत्रातही ठसा उमटत आहे. म्हणूनच महिला प्राध्यापिकांचे लेखन ही केवळ एक सवय नसून समाजपरिवर्तनाची शक्ती आहे.

संदर्भ :-

1. कज्हाडे, बी. एम., शास्त्रीय संशोधन पध्दती, नागपूर, पिंपळापुरे ॲन्ड पब्लिशर्स, 2007.
2. काचोळे दा. धो., सामाजिक संशोधन पध्दती, औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन, 2005.
3. कर्णिक, प्रदिप संशोधन प्रकल्प स्वरूप व लेखन पध्दती, नाशिक यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, 2005.
4. ग्रंथालय माहितीशास्त्र वस्तुनिष्ठ वर्णनात्मक अभ्यास :- प्रा. लक्ष्मण थोरात.
5. माहिती तंत्रज्ञान- सुजाता कोण्णूर.
6. ग्रंथालयआणिमाहितीशास्त्र :- डॉ. धनंजयभगवानसुतार

UGC NET/JRF/SET Library and Information Science

- Nandini Sharma, Farah Sultan
- Aditya Raj KanikaKhandelwal

संशोधक

प्रिती केशवराव सावंत

(M. Lib & I. Sci.)

मार्गदर्शक

डॉ. घ. ना. पांचाळ